
# रॅगिंग



रॅगिंग म्हणजे विद्यापीठ, महाविद्यालयात शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांकडून कोणतीही लेखी किंवा तोंडी कृती की ज्यामुळे एखाद्या विद्यार्थ्याला दु:ख किंवा कष्ट होईल असे असभ्य वर्तन.



## रॅगिंगमध्ये कोणत्या बाबींचा समावेश होतो

१. एखाद्या विद्यार्थ्याकडून दुस-या विद्यार्थ्यांना इतरांसमोर अपमानास्पद वागणूक देणे.

२. छळ करणे

३. एखाद्या विद्यार्थ्याला त्याच्या मनाविरुध्द कृत्य करण्यास भाग पाडणे.

४. त्यांच्यात दहशतीचे वातावरण निर्माण करणे.

५. अमानवीय गैर प्रकार करुन घेणे

६. अशी कृती करणे ज्यामुळे विद्यार्थ्यामध्ये मानसिक दडपण येईल.

## रॅगिंग प्रतिबंधक कायद्याच्या कलम ४ नुसार कोणती शिक्षा होऊ शकते?

रॅगिंग प्रतिबंधक कायद्याच्या कलम ४ नुसार जी व्यक्ती कोणत्याही शैक्षणिक संस्थेमध्ये किंवा तीच्याबाहेर प्रत्यक्षरित्या किंवा अप्रत्यक्षरित्या रॅगिंग करीत असेल किंवा त्याचा प्रसार करीत असेल तर त्या व्यक्तीला अपराध सिध्दतेनंतर दोन वर्षांपर्यंत इतक्या मुदतीच्या कारावासाची शिक्षा होईल आणि ती दहा हजार रुपयांपर्यंत असेल इतक्या द्रव्य दंडाची शिक्षा होईल.

## रॅगिंग अपराधाबद्दल सजा झालेल्या अपराध्यास संस्थेतून काढून टाकण्यात येते काय?

या कायद्याच्या कलम ५ नुसार रगिंगचा अपराध करणाऱ्याला अपराध सिध्दतेनंतर शैक्षणिक संस्थेतून काढून टाकण्याची तरतूद करण्यात आलेली आहे :

कलम ४ : खालील एखाद्या अपराधाबद्दल अपराध सिध्द झालेल्या कोणत्याही विद्यार्थ्यास शैक्षणिक संस्थेतून काढून टाकण्यात येईल आणि अशा प्रकारे काढून टाकण्यात आल्याच्या आदेशाच्या दिनांकापासून पाच वर्षांच्या कालावधीकरीता कोणत्याही इतर संस्थेमध्ये अशा विद्यार्थ्यास प्रवेश देण्यात येणार नाही. तसेच कलम ६ अन्वये विद्यार्थ्यांना निलंबित करणे या संबंधी तरतूद आहे.

## रॅगिंग अपराधास सहाय्य केल्याचे केव्हा मानले जाईल.

कलम ६ अन्वये रॅगिंगची तक्रार केली असताना कलम ६ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या रीतीने कारवाई करण्यास शैक्षणिक संस्थेचा प्रमुख कसूर किंवा हयगय करीत असेल तर अशा व्यक्तीस रॅगिंग सारख्या गुन्ह्यास सहाय्य केल्याचे मानण्यात येईल. अशा शैक्षणिक संस्थेच्या प्रमुखास अपराध सिध्दीनंतर कलम ४ नुसार शिक्षा केली जाऊ शकते.




न्याय सब के लिए
ACCESS TO JUSTICE FOR ALL

**महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, मुंबई**

१०५, उच्च न्यायालय (पी.डब्ल्यू.डी.) इमारत, फोर्ट, मुंबई ४०० ०३२

वेबसाईट : legalservices.maharashtra.gov.in ❖ ई-मेल : mslsa-bhc@nic.in

फोन : (०२२) २२६९१३९५ / २२६६५८६६ / (०२२) २२६९१३५८ ❖ फॅक्स : (०२२) २२६७४२९५

# विधी सेवा प्राधिकरण कायदेविषयक माहिती

## कार्ये

विधी सेवा प्राधिकरण/समिती द्वारा निम्न लिखित कार्ये केली जातात

- न्यायालय/न्यायाधिकरण/प्राधिकरण समक्ष कोणतेही प्रकरण किंवा इतर कायदेशीर कार्यवाही चालविण्याच्या प्रक्रियेत समुपदेशनाच्या स्वरुपात मोफत विधी सहाय्य पुरविणे आणि मोफत विधी सेवा पुरविणे.
- खर्च व वेळेची बचत करुन तसेच तांत्रिक बाबींचा अडसर टाळून जलदगतीने न्याय मिळवून देण्याच्या हमी करीता, प्रलंबित प्रकरणांमध्ये तसेच असे वाद जे न्यायालयासमक्ष आणले गेले नाहीत अशा वादांमध्ये सुध्दा समझोता करीता लोक न्यायालय आयोजित करणे.
- वैवाहिक वाद मध्यस्थ आणि समेट पध्दतीने मिटविणे.
- कज्जे वादातील पक्षकार आणि सर्व सामान्य जनतेत, सामाजिक व विधी दृष्टया महत्वाच्या मुद्दयांवर कायदेशीर बाबी संबंधी जागरुकता निर्माण करणे.
- कैद्यांना आणि न्यायाधिन बंदींना मोफत विधी सेवा प्रदान करणे.

## विधि सेवा प्राधिकरण/समिती खालील व्यक्तींना मोफत विधी सेवा पुरविते –

- अनुसूचित जाती किंवा जमातीतील व्यक्ती
- अवैध मानवी व्यापारातील बळी किंवा भिकारी
- स्त्रिया अथवा बालके
- अपंग व्यक्ती म्हणजेच अशा व्यक्ती ज्या अंधत्व, कुष्ठरोग, एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी जाण्यात असमर्थता बहिरेपणा, मानसिक असमर्थता यांनी ग्रस्त आहेत.
- सार्वत्रिक आपत्ती, जातीय हिंसाचार, जातीय अत्याचार, पूर दुष्काळी, भूकंप किंवा औद्योगिक आपत्तीचे बळी.
- औद्योगिक कामगार.
- अन्विक्षाधीन, न्यायालयीन कोठडीत असलेल्या व्यक्ती ज्यांमध्ये सुरक्षागृहातील किशोरवयीन अपराधी, म्हणजेच १८ वर्षे पर्यत वय असलेल्या व्यक्तींचा किंवा मनोरुग्णालयातील अथवा शुश्रूषालयातील मानसिक रुग्ण यांचा समावेश आहे.
- वार्षिक उत्पन्न रु ५०,०००/– पेक्षा कमी असलेल्या व्यक्ती.

## कोणकोणत्या विषयांसंबंधात कायदेशीर सहाय्य उपलब्ध करुन घेता येणार नाही?

- मानहानी :
- विद्वेषपूर्ण अभियोग :
- न्यायालयाचा अवमान किंवा खोटी साक्ष देणे या आरोपाखाली कार्यवाही करण्यात येणाऱ्या व्यक्ती,
- कोणत्याही निवडणूकसंबंधी कार्यवाही
- आर्थिक गुन्हेसंबंधी आणि सामाजिक कायदयांच्या विरुध्द गुन्हें जसे की, अस्पृश्यता किंवा जातीच्या आधारावर किंवा जातीय पूर्वग्रह दुषिततेच्या विरोधातील तक्रारींचा प्रतिवाद करणे.

## कोणत्या स्वरुपाची विधी सहाय्यता पुरविली जाते ?

- कोणत्याही न्यायालयीन कार्यवाहीशी संबंधित देय किंवा झालेला सर्व खर्च,
- कोणत्याही कायदेशीर कार्यवाहीमध्ये मसुदालेखन करणे, दस्तऐवज तयार करणे आणि कायदेशीर कार्यवाहीमध्ये विधी व्यवसायीने प्रतिनिधीत्व करणे यासाठीचा खर्च
- कायदेशीर कार्यवाहीमध्ये आदेशांच्या, न्यायनिर्णयांच्या प्रती/प्रमाणित प्रती मिळविण्यासाठी लागणारा खर्च व इतर किरकोळ खर्च.
- कायदेशीर कार्यवाहीमध्ये झालेला इतर खर्च, उदा खटल्याचे कागद–पुस्तक तयार करणे (ज्यामध्ये कागद, छपाई आणि कागदपत्रांचे भाषांतर सामील आहे) आणि त्यास अनुषंगिक इतर खर्च.

## विधि सहाय्य प्राप्त करण्यासाठी कशाप्रकारे अर्ज करावा?

- संक्षिप्त स्वरुपात तक्रार किंवा सहाय्यता प्राप्त करण्याचे कारण नमूद करुन एक लिखित स्वरुपात अर्ज दाखल करुन :
- जर अर्जदार अशिक्षित असेल किंवा लिहिण्याच्या स्थितीत नसेल तर, विधी सेवा प्राधिकरण/समिती चे सदस्य सचिव किंवा अधिकारी त्यांचे तोंडी निवेदन नोंदवून घेतील आणि नोंदविलेल्या निवेदनावर त्याची सही/अंगठयाचा ठसा घेतील आणि असे निवेदन अशा व्यक्तीचा अर्ज समजण्यात येईल.
- अर्जदारास विधी सेवा प्राधिकरण/समितीकडे विनाशुल्क उपलब्ध असलेल्या एका विहित नमुन्यात शपथपत्र निष्पादित करुन दयावे लागेल, ज्यायोगे अर्जदाराची विधी सहाय्य प्राप्त करण्यासंबंधी निकष तपासून घेता येईल.
- विधी सेवा प्राधिकरण/समितीचे सदस्य सचिव अर्जदाराची त्याने शपथपत्रामध्ये सांगितलेल्या तथ्यांची पडताळणी करण्यासाठी तपासणीसुध्दा करु शकतात.


**महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, मुंबई**

१०५, उच्च न्यायालय (पी.डब्ल्यू.डी.) इमारत, फोर्ट, मुंबई ४०० ०३२

वेबसाईट : legalservices.maharashtra.gov.in ❖ ई-मेल : mslsa-bhc@nic.in

फोन : (०२२) २२६९१३९५ / २२६६५८६६ / (०२२) २२६९१३५८ ❖ फॅक्स : (०२२) २२६७४२९५

# लोकन्यायालय



## लोकन्यायालय म्हणजे काय?

वाद उद्‌भवला तर तो शक्यतोवर सामंजस्याने सोडवावा ही आपली प्राचीन परंपरा. गावातील जुनी–जाणती माणसे एकत्र येत आणि कोणाही मध्ये उद्‌भवलेला कुठल्याही स्वरुपाचा वाद समजुतीने मिटवित. ज्यांच्यापुढे वाद नेला जाई ते त्या गावातील आदरणीय आणि नि:पक्षपाती लोक असत. यालाच 'गाव–पंचायत' असे म्हणत. सध्याचे 'लोकन्यायालय' म्हणजे या गाव पंचायतीचेच आधुनिक रुप. जेथे कायदा जाणणाऱ्या नि:पक्षपाती लोकांचे न्यायमंडळ त्यांच्यापुढे येणाऱ्या प्रकरणांमध्ये सामंजस्याने न्याय्य तडजोड घडविते.

## लोकन्यायालये कोठे भरविली जातात?

लोकन्यायालये राज्यातील सर्व न्यायालयांमध्ये नियमितपणे भरविली जातात. प्रत्येक जिल्हयाच्या वा तालुक्याच्या ठिकाणी दोन महिन्यातून किमान एकदा व आवश्यकता भासल्यास त्याहून अधिक वेळा योग्य त्या सूचना देऊन त्या–त्या न्यायालयामध्ये लोकन्यायालयाचे आयोजन केले जाते. जिल्हयाच्या ठिकाणी होणारी लोकन्यायालये जिल्हा न्यायालयात तर तालुक्याच्या ठिकाणी होणारी लोकन्यायालये तालुका कोर्ट परिसरात भरविली जातात. उच्च न्यायालयामध्ये मुंबई येथे तसेच नागपूर आणि औरंगाबाद खंडपीठाचे ठिकाणी देखील लोकन्यायालये भरविली जातात.

## लोकन्यायालयाचे आयोजन कोण करते?

लोकन्यायालयाचे आयोजन विधी सेवा प्राधिकरणांमार्फत केले जाते. राज्य व जिल्हा विधी सेवा प्राधिकरणे, तालुका विधी सेवा समित्या व उच्च न्यायालय विधी सेवा समिती याद्वारा विधी सेवा प्राधिकरण अधिनियम, १९८७ मधील तरतूदी अंतर्गत लोकन्यायालयांचे वेळोवेळी आयोजन केले जाते. लोक न्यायालयाची तारीख सामान्यत: एक महिना अगोदर जाहीर केली जाते.

## लोकन्यायालयांची रचना कशी असते?

लोकन्यायालय देखील एकाअर्थी कोर्टच असते. उलटपक्षी कोर्टात जेथे तुमच्या खटल्याच्या निवाडयासाठी एकच न्यायाधीश असतात तेथे लोकन्यायालयात किमान तीन जाणकार व्यक्तींचे पॅनेल न्यायाधीशांची भूमिका बजावते. कार्यरत अथवा निवृत्त ज्येष्ठ न्यायाधीश पॅनेलचे प्रमुख म्हणून तर अनुभवी वकील अथवा कायदयाच्या जाणकार व्यक्ती सदस्य म्हणून लोकन्यायालयाचे काम पहातात.

## लोकन्यायालयापुढे कुठले खटले येतात?

लोकन्यायालयामध्ये दिवाणी व फौजदारी दोन्ही स्वरुपाची प्रकरणे समेटासाठी येऊ शकतात. मोटार अपघात व भूसंपादन नुकसान भरपाईचे दावे, बँका व अन्य वित्तिय संस्थांचे वसुलीचे दावे, वैवाहिक संबंधातील वाद, निगोशिएबल इन्स्ट्रुमेंट ॲक्टच्या कलम १३८ खाली दाखल झालेली प्रकरणे वगैरेंसाठी स्वतंत्ररित्या खास लोकन्यायालये आयोजित केली जातात. वरील प्रकारात मोडणारी न्यायालयात प्रलंबित असलेली प्रकरणे तर लोकन्यायालयात घेता येतातच शिवाय कोर्टात दाखल न झालेली प्रकरणे देखील (Pre-Litigation) लोकन्यायालयापुढे समेटासाठी येऊ शकतात व त्याबाबत देखील लोकन्यायालयात निवाडा होऊ शकतो. म्हणजेच तुमचा वाद तुम्ही कोर्टात प्रकरण दाखल करण्याअगोदर देखील लोकन्यायालयासमोर नेऊन त्याचा निवाडा करुन घेऊ शकता.

## लोकन्यायालयासमोर दावा कसा येऊ शकेल?

ज्या न्यायालयात आपला खटला प्रलंबित आहे तेथे एक साधा अर्ज देऊन केसच्या कुठल्याही टप्प्यावर आपण आपला खटला लोकन्यायालयापुढे नेऊ शकतो. असा अर्ज आल्यावर न्यायाधीश दोन्ही पक्षांचे म्हणणे ऐकून घेतात व दाव्यातील वाद आपसात समजूतीने मिटू शकेल असे मत झाल्यास प्रकरण लोकन्यायालयापुढे ठेवण्याचा आदेश करतात. दावा व कैफियतीतील कथनांवरुन संबंधित न्यायाधीशांना प्रकरणाची आपसात समजुतीने मिटण्याची शक्यता वाटली तर कुठल्याही पक्षाचा अर्ज नसला तरी न्यायाधीश स्वत:हून खटला लोकन्यायालयाकडे वर्ग करु शकतात.

## लोकन्यायालयाच्या निवाडयाची अंमलबजावणी कशी होते?


लोकन्यायालयात होणारा निवाडा म्हणजे कोर्टाचा पक्का हुकूमनामाच. लोकन्यायालयापुढे पक्षकार जी आपसात समजूत करतात किंवा आपसात समजूतीचा जो मसूदा तयार करतात त्याचेच रुपांतर लोकन्यायालयाच्या निवाडयात होते. कोर्टाच्या हुकूमनाम्याची व्हावी तशीच अंमलबजावणी लोकन्यायालयात झालेल्या निवाडयाची करता येते आणि त्याहून महत्वाचे म्हणजे लोकन्यायालयात होणारा निवाडा हा अंतिम असतो. त्या विरुध्द अपील करता येत नाही.

## लोकन्यायालयात समेट झाला नाही तर काय?

समजा काही कारणास्तव तुमचा वाद लोकन्यायालयात मिटू शकला नाही तर तुमचा दावा संबंधित कोर्टाकडे परत जातो व प्रचलित न्याय पध्दतीप्रमाणे दाव्यासंदर्भातील दरम्यानचे काळात तात्पुरती थांबलेली कारवाई पुढे सुरु होते. दावा कोर्टात दाखल करण्यापूर्वी लोकन्यायालयापुढे आणला असेल (Pre-Litigation) व त्याचा निवाडा होऊ शकला नाही तर कोर्टात केस दाखल करण्याचा मार्ग मोकळा राहतोच. लोकन्यायालयासमोर तुम्ही काही तडजोडीचा प्रस्ताव दिला असला तरी तो मूळ केसच्या रेकॉर्डवर कुठेही येत नाही व दाव्याच्या गुणवत्तेच्या आधारे निकाली होण्याच्या प्रक्रियेवर त्याचा काहीही अनुकूल अथवा विपरीत परिणाम होत नाही. सारांश – लोकन्यायालयापुढे येण्यात नुकसान काहीच नाही.

## लोकन्यायालयाचे फायदे

१. केसचा झटपट निकाल लागतो. तोंडी पुरावा–उलटतपासणी–दीर्घ युक्तिवाद या बाबी टाळल्या जातात.
२. लोकन्यायालयाच्या निवाडयाविरुध्द अपील नाही. एकाच निर्णयात कोर्टबाजीतून कायमची सुटका होते.
३. लोकन्यायालयात होणारा निवाडा हा आपसात समजूतीने होत असल्याने ना कोणाचा जय होतो ना कोणाची हार.
४. लोकन्यायालयाचा निवाडा दोन्ही पक्षांना समाधान देतो.
५. परस्पर संमतीने निकाल होत असल्याने एकमेकातील द्वेष वाढत नाही व कटूताही निर्माण होत नाही.
६. कोर्टाच्या हुकूमनाम्याप्रमाणेच लोकन्यायालयात होणाऱ्या निवाडयाची अंमलबजावणी कोर्टामार्फत करता येते.
७. वेळ आणि पैसा दोघांचीही बचत होते.
८. लोकन्यायालयात निकाली निघणाऱ्या प्रकरणांमध्ये कायदयानुसार कोर्ट फी ची रक्कम परत मिळते.





**महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, मुंबई**

१०५, उच्च न्यायालय (पी.डब्ल्यू.डी.) इमारत, फोर्ट, मुंबई ४०० ०३२

वेबसाईट : legalservices.maharashtra.gov.in ❖ ई-मेल : mslsa-bhc@nic.in

फोन : (०२२) २२६९१३९५ / २२६६५८६६ / (०२२) २२६९१३५८ ❖ फॅक्स : (०२२) २२६७४२९५

# वरिष्ठ नागरिकांचे अधिकार



**उद्दीष्ट :** आपल्या देशात वरिष्ठ नागरिकांना सांभाळण्याची जबाबदारी त्यांच्या पाल्यांवर असते. पूर्वी घरात हवे नको ते बघण्याची मुलांची धडपड असायची, परंतू आज परिस्थिती बदललेली आहे. त्यांना वृध्द व्यक्ती घरात असणे हे अडचणीचे वाटते, त्यामुळे त्यांच्या पालनपोषणाची जबाबदारी मुले विसरत चालली आहेत. वरिष्ठ नागरिकांना आर्थिक सहाय्य मिळावे, त्यांचे पालनपोषण नीट व्हावे याबाबत फौजदारी प्रक्रिया संहीतेमध्ये तरतूद केलेली आहे. वरिष्ठ नागरिकांकडे पाहण्याचा दृष्टीकोन बदलला आहे, त्याचा विचार करुन सन २००७ मध्ये आई-वडील व वरिष्ठ नागरिकांचे कल्याण व पालणपोषण अधिनियम २००७ (The Maintenance and Welfare of Parents and Senior Citizens Act, 2007) अंमलात आणण्यात आले.



## सदर कायद्यात असलेली तरतूद

जे वरिष्ठ नागरिक स्वत:च्या कमाईने किंवा असलेल्या संपत्तीने स्वत:चे पालन-पोषण करण्यास असमर्थ आहेत ते आपल्या मुलाकडून पोटगी मिळविण्यासाठी अर्ज दाखल करु शकतात. सदर कायद्यानुसार तसेच कलम १२५ फौजदारी प्रक्रिया संहिता यानुसार वरिष्ठांना त्यांच्या मुलाकडून स्वत:चे पालन-पोषण करीता रक्कम पोटगी म्हणून स्वीकारण्याचा कायदेशीर अधिकार आहे, सदर पोटगीची रक्कम सर्वस्वी मुलांचे उत्पनावर अवलंबून असते. त्याचे उत्पन्न व त्याच्या परिवाराचा खर्च हे विचारात घेऊनच न्यायालय पोटगीची रक्कम ठरवित असते.

## वरिष्ठ नागरिकांचे कल्याण म्हणजे नेमके काय?

पोटगी व्यतीरिक्त वरिष्ठ नागरिकांचे आरोग्याची देखभाल, त्यांच्या अन्न पाण्याची व्यवस्था, त्यांचे मनोरंजन अथवा मन रमविण्याकरिता केंद्र बनविणे आणि आवश्यक त्या सर्व सोयी पूरविणे यालाच कल्याणाचे कायद्याचे काम म्हटले जाते.

## सदर कायद्यानुसार अर्ज कोण करु शकते?

या कायद्याखाली स्वत: वरिष्ठ नागरिक अथवा पालक, जर ते असमर्थ असतील तर त्यांनी अधिकार दिलेली व्यक्ती किंवा संस्था अर्ज करु शकते. अथवा न्यायाधिकरण स्वत: त्याची दखल घेऊ शकतात.

## जर मुलगा किंवा नातेवाईकाने पालन-पोषणाची ठरवून दिलेली रक्कम अदा केली नाही तर काय?

अशा परिस्थितीत न्यायाधिकरण आपले आदेशावर अंमल करण्यासाठी स्वत: फौजदारी न्यायालयाचे अधिकाराचा वापर करेल.

## वृध्दांसाठी काही कल्याणाच्या योजना :

राज्य सरकारने टप्याटप्याने राज्यातील सर्व जिल्ह्यांत किमान एक वृध्दाश्रम ज्यामध्ये किमान १५० निराधार वरिष्ठ नागरिक राहू शकतात असे वृध्दाश्रम स्थापन करणे अपेक्षित आहे. निराधार राहणाऱ्या वृद्धांकरीता अशा वृध्दाश्रमात मनोरंजनाची व्यवस्था असेल, त्यामुळे ते तेथे प्रसन्न राहू शकतील, त्या ठिकाणी त्यांच्या आरोग्याची देखभाल करण्यासाठी देखील आवश्यक ती व्यवस्था असेल.



## सदर कायद्यानुसार कोणती कार्यवाही होऊ शकते?

आई-वडील अगर वरिष्ठ नागरिकांचे कल्याण व पालन पोषण अधिनियम २००७ चे कलम २४ नुसार ज्या व्यक्तीकडे वरिष्ठ नागरिकाची देखभाल अथवा संरक्षण करण्याची जबाबदारी आहे त्या व्यक्तीने त्यांचेपासुन सुटका मिळावी म्हणून त्यांना कुठेतरी सोडून दिले तर त्या व्यक्तीस तीन महिन्यांपर्यंतची तुरुंगवास किंवा रूपये ५०००/- पर्यंत दंड किंवा दोन्ही अशी शिक्षा होऊ शकते.


**महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, मुंबई**

१०५, उच्च न्यायालय (पी.डब्ल्यू.डी.) इमारत, फोर्ट, मुंबई ४०० ०३२

वेबसाईट : legalservices.maharashtra.gov.in ❖ ई-मेल : mslsa-bhc@nic.in

फोन : (०२२) २२६९१३९५ / २२६६५८६६ / (०२२) २२६९१३५८ ❖ फॅक्स : (०२२) २२६७४२९५

# बालकांना मोफत व सक्तीचे शिक्षण अधिकार - २००९



बालकांना मोफत व सक्तीचे शिक्षण अधिकार २००९ हा ६ वर्षे ते १४ वर्षांपर्यंतच्या मुलांना सक्तीचे शिक्षण देण्याबाबतचा कायदा आहे. बालकांच्या व्याख्येत १४ वर्षांखालील सर्व मुलामुलींचा समावेश होतो. या कायद्यानुसार देशातील ६ ते १४ वर्षे वयोगटातील प्रत्येक बालकास प्राथमिक शिक्षण वर्ग १ली ते ८वी पर्यंतचे शिक्षण घेण्याचा अधिकार आहे. हे शिक्षण शासनाद्वारे नि:शुल्क आणि त्यांच्या घराजवळील शाळेत उपलब्ध करुन देणे विषयी या कायद्यात तरतूद आहे.

## अनिवार्य शिक्षण म्हणजे काय व त्याचा कोणत्या बालकांना फायदा मिळू शकतो?

६ ते १४ वर्षांपर्यंतच्या सर्व मुलामुलींना नि:शुल्क आणि अनिवार्य शिक्षण प्राप्त करण्याचा अधिकार आहे.

तसेच अनुसूचित जाती-जमाती, सामाजिक आणि आर्थिकरित्या मागासलेल्या परिवारातील तसेच दारिद्रय रेषेखालील जीवन जगणा-या परिवारातील मुलांना, अपंगांना नि:शुल्क आणि अनिवार्य शिक्षण घेण्याचा अधिकार आहे. त्यात कुठल्याही प्रकारचा भेदभाव करता येणार नाही. तसेच त्याला ते राहत असलेल्या जवळच्या शाळेत प्राथमिक शिक्षण पूर्ण होईपर्यंत सक्तीचे शिक्षण घेण्याचा अधिकार आहे.



## ज्या बालकाचे प्राथमिक शिक्षण पूर्ण झालेले नाही त्यांच्याकरिता या कायद्यात काय तरतूद आहे?

कलम ४ नुसार जे बालक ६ वर्षांपेक्षा मोठे आहेत परंतु त्यांनी कुठल्याही शाळेत दाखला घेतला नसेल किंवा घेतला असेल परंतु त्यांनी प्राथमिक शिक्षण पूर्ण केले नसेल, अशा परिस्थितीत त्याला त्याच्या वयानुसार आवश्यक अशा वर्गात दाखला देण्याचे प्रावदान आहे. तसेच सदर बालकास समकक्ष वयाच्या मुलाच्या बरोबरीने आणण्यासाठी त्यास विशेष प्रशिक्षण देण्याचे प्रावदान आहे. त्याचप्रमाणे सदर बालकास प्राथमिक शिक्षण पूर्ण होईपर्यंत जरी त्याचे वय १४ वर्षांपेक्षा जास्त झाले तरीही त्यास प्राथमिक शिक्षण पूर्ण करण्याचा अधिकार आहे.

## या अधिनियमाचे उल्लंघन होत असेल तर?

१. कोणत्याही शाळेस किंवा व्यक्तीस, बालकास शाळेत प्रवेश देतेवेळी या कायद्याचे कलम १३ नुसार त्या शाळेने जाहिर केलेल्या शुल्का व्यतिरिक्त देणगी किंवा वर्गणी स्वरुपात रक्कम स्विकारता येणार नाही. परंतु एखाद्या शाळेने तसे केल्यास त्या शाळेकडून स्विकारलेल्या रकमेच्या दहा पट इतकी रक्कम दंड करण्याची तरतूद आहे.

२. शाळेने बालकास प्रवेश देतेवेळी त्यास किंवा त्याचे पालकास चाळणी प्रक्रियेस सामोरे जाणेस भाग पाडता येणार नाही. तसे केल्यास प्रथम उल्लंघनास रुपये २५,०००/- दंड व त्यापुढील प्रत्येक उल्लंघनास रुपये ५०,०००/- दंड करण्याची तरतूद या कायद्यात आहे.

## या कायद्याची ठळक वैशिष्ट्ये :

१. प्रत्येक बालक ज्याचे वय ६ वर्षे ते १४ वर्षांपर्यंतचे आहे त्याला मोफत सक्तीचे शिक्षण घेण्याचा अधिकार आहे.

२. ३ ते ६ वर्षांपर्यंत वयाच्या बालकांना मोफत शिक्षण देण्याची व्यवस्था करणे ही जबाबदारी सरकारची आहे.

३. कुणीही बालक जन्माचा दाखला नाही या सबबीखाली प्रवेशाकरीता वंचित राहणार नाही.

४. कलम ७ नुसार शाळेकरीता लागणारे अनुदान देणे ही केंद्र शासन व राज्य शासनाची संयुक्तिक जबाबदारी आहे.

५. स्थानिक प्राधिकरणाने सर्व बालकांना मोफत व सक्तीचे शिक्षण पूरविणे बंधनकारक आहे.

६. आई-वडीलांना किंवा पालकांना स्थानिक प्राधिकरणाच्या व्यतिरिक्त चालविण्यात येणा-या शाळेत प्रवेश घ्यावयाचा असेल त्यावेळेस त्यांना येणारा खर्च परत मागण्याचा त्यांना अधिकार नाही.

७. बालकाच्या अधिकाराची सुरक्षा करणेकरीता राष्ट्रीय आयोग तसेच राज्य आयोगाची निर्मिती करण्यात आलेली आहे. या आयोगास बालकाच्या विकासासाठी आवश्यक असणारी संपूर्ण शक्ती प्रदान करण्यात आली आहे.




न्याय सब के लिए
ACCESS TO JUSTICE FOR ALL
महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, मुं
१०५, उच्च न्यायालय (पी.डब्ल्यू.डी.) इमारत, फोर्ट, मुंबई ४०० ०३२
वेबसाईट : legalservices.maharashtra.gov.in ❖ ई-मेल : mslsa-bhc@nic.in
फोन : (०२२) २२६९१३९५ / २२६६५८६६ / (०२२) २२६९१३५८ ❖ फॅक्स : (०२२) २२६७४२

# कौटुंबिक हिंसाचार प्रतिबंधक कायदा, २००५



कुटुंबातील कोणत्याही पुरुष नातेवाईकांकडून जर स्त्रिचा शारिरीक व मानसिक, आर्थिक, सामाजिक वा इतर प्रकारचा छळ होत असेल तर ह्या कायद्यांतर्गत स्त्रिला दादच नाही तर संरक्षण मागता येते. स्त्रियांवर होणाऱ्या कौटुंबिक अत्याचाराबाबात भारतीय दंड सहितेनुसार, फौजदारी कायदा अस्तित्वात आहे. कौटुंबिक अत्याचाराबाबात प्रतिबंधक आदेशाच्या स्वरुपात प्रभावि उपाययोजना व्हाव्यात या दृष्टीने प्रस्तूत कायदा अस्तित्वात आला.

## कौटूंबिक हिंसाचार काय आहे?

या कायद्यामध्ये घरातील महिलेसोबत शारिरीक हिंसा, मानसिक हिंसा, लैगिक अत्याचार, आर्थिक हिंसा, शाब्दिक आणि भावनात्मक शोषण या सर्व कृत्यांना घरगुती हिंसाचार मानले आहे.

स्त्रिया किंवा तिच्या नातेवाईकांचा हुंड्यासाठी अथवा दुसऱ्या कोणत्याही संपत्तीच्या मागणीसाठी छळ करणे याचा सुध्दा घरगुती हिंसाचारामध्ये समाविष्ट होतो.

## पिडित स्त्रीचे काय अधिकार आहेत?

संरक्षणासाठी स्त्रीला मिळणारे अधिकार खालीलप्रमाणे आहेत.

१) मदत मिळविण्यासाठी अर्ज करणे. (संरक्षण आदेश, आर्थिक मदत, मुलांचा ताबा मिळणारे आदेश, निवास आदेश आणि नुकसान भरपाईचा आदेश)

२) संरक्षण अधिकाऱ्याची सेवा मिळविण्यास पात्र

३) विनामुल्य कायदेविषयक मदत

४) भारतीय दंड विधान कलम ४९८ अ नुसार तक्रार दाखल करणे.

## संरक्षण अधिकारी कोण असतो?

संरक्षण अधिकाऱ्याची नियूक्ती राज्य सरकारद्वारे केली जाते.

## पिंडीताला खालील प्रकारच्या मदती मिळू शकतात.

- संरक्षण आदेश
- आर्थिक मदत
- मुलांचा ताबा मिळणेचा आदेश
- घरात राहण्याबाबात आदेश
- नुकसान भरपाई आदेश

## घरगुती हिंसाचाराच्या आरोपीला किती शिक्षा होऊ शकते?

कलम ३१ अन्वये आरोपीने जर तात्पूरते संरक्षण आदेशाचे किंवा संरक्षण आदेशाने उल्लंघन केले तर व पीडीत स्त्रीवर पून्हा हिंसाचार केला तर आरोपीला एक वर्षापर्यंत तुरुंगवास किंवा रु. २०,०००/- पर्यंत दंड किंवा दोन्ही अशी शिक्षा होऊ शकते.



## संरक्षण अधिका-याने कर्तव्ये पार पाडली नाहीत तर काय होऊ शकते?

कलम ३३ अन्वये संरक्षण अधिका-याने कर्तव्ये पार पाडली नाहीत तर त्यांनाही एक वर्ष कैद व रुपये २०,०००/- पर्यंत दंड किंवा दोन्हीही अशी शिक्षा होऊ शकते.

## तक्रार कशी कराल?



प्रत्यक्ष जाऊन संरक्षण अधिकारी अथवा पोलीस यांच्याकडे तक्रार करता येईल.

पोलीसांकडे गेलात तर पोलीसांनी तूमचा अर्ज कौटूंबिक हिंसाचार अहवाल म्हणून नोंद करुन संरक्षण अधिकारी व न्यायालयाकडे पाठवावा. सेवा देणाऱ्या स्वयंसेवी संस्थाकडे अर्ज दिला असता तुमचा अर्ज कौटूंबिक हिंसाचार घटना अहवाल म्हणून नोंद करुन संरक्षण अधिकारी तो अर्ज न्यायालयात पाठवील. या कायद्याखाली एखादा आदेश प्राप्त करण्याकरीता स्वत:देखील न्यायदंडाधिकारी यांचेकडे अर्ज करु शकतात.


**महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, मुंबई**

१०५, उच्च न्यायालय (पी.डब्ल्यू.डी.) इमारत, फोर्ट, मुंबई ४०० ०३२

वेबसाईट : legalservices.maharashtra.gov.in ❖ ई-मेल : mslsa-bhc@nic.in

फोन : (०२२) २२६९१३९५ / २२६६५८६६ / (०२२) २२६९१३५८ ❖ फॅक्स : (०२२) २२६७४२९५

# गर्भलिंग निवड प्रतिबंध कायदा १९९४



## कायद्याचा उद्देश :-

ह्या कायद्याचा मुख्य उद्देश हा आहे की गर्भलिंग निवड करुन मुलगी असल्यास तिच्या जन्माआधीच स्त्री भ्रुणहत्येच्या प्रथेस आळा घातला जाईल.

## गर्भलिंग चाचणी म्हणजे काय?

गर्भलिंग परिक्षण, अल्ट्रासोनोग्राफी, रक्तचाचणी किंवा इतर अशी कोणतीही चाचणी, ज्यामुळे गर्भाचे लिंग ओळखणे शक्य होईल.

## अपराध व शिक्षा :-

▲ गर्भलिंग चाचणी करण्यासंबंधी प्रत्यक्षरित्या वा अप्रत्यक्षरित्या प्रसार करणे गुन्हा आहे, त्यासाठी ३ वर्षापर्यंत कैद व १० हजार रुपयांपर्यंत दंड होऊ शकतो.



▲ जी व्यक्ती गर्भलिंग ओळखण्यासाठी गर्भलिंग चाचणी करून घेते. म्हणजे गर्भ मुलीचा असला तर गर्भपात करता यावा, त्या व्यक्तीस प्रथम वेळेस तीन वर्षे कैद, पन्नास हजार रूपये पर्यंत दंड, तर नंतरच्या प्रत्येक गुन्ह्यासाठी पाच वर्षापर्यंत कैद व एक लाख रुपयांपर्यंत दंड होऊ शकतो.

▲ कोणत्याही स्त्रीला जबरदस्तीने गर्भलिंग चाचणी करावयास लावणाऱ्या व्यक्तीला शिक्षा होईल. मात्र त्या स्त्रीला शिक्षा होणार नाही.

▲ गुन्हेगार नोंदणीकृत वैद्यकीय अधिकारी असल्यास खटल्याचा निकाल लागेपर्यंत त्यांची नोंदणी रद्द होईल व गुन्हा सिध्द झाल्यास प्रथमवेळेस ५ वर्षांसाठी व दुसऱ्या वेळेस नेहमीसाठीच रद्द करण्यात येईल.

▲ गर्भ चाचणी करण्याचे कोणतेही तंत्रज्ञान या कायद्यांतर्गत नोंदणीकृत व्यक्ति अथवा चिकित्सालया व्यतिरिक्त इतर कोणासही विकणे हा गुन्हा आहे.

▲ या कायद्यांतर्गत सर्व गुन्हे दखलपात्र व अजामीनपात्र आहेत.



▲ गुन्ह्याची तक्रार स्वत: पिडीत व्यक्तीला व तीच्या नातेवाईकाला केंद्र सरकार किंवा राज्य सरकारने नियुक्त केलेल्या समितीकडे लेखी स्वरुपात करावी लागते.

▲ जर सामाजिक संस्थेने अशा समितीकडे गुन्ह्याची तक्रार केली व जर त्या समितीने पंधरा दिवसांत योग्य ती कार्यवाही केली नाही तर ती सामाजिक संस्था थेट प्रथम वर्ग दंडाधिकारी न्यायालयात गुन्ह्याची तक्रार करु शकते.


**महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, मुंबई**

१०५, उच्च न्यायालय (पी.डब्ल्यू.डी.) इमारत, फोर्ट, मुंबई ४०० ०३२

वेबसाईट : legalservices.maharashtra.gov.in ❖ ई-मेल : mslsa-bhc@nic.in

फोन : (०२२) २२६९१३९५ / २२६६५८६६ / (०२२) २२६९१३५८ ❖ फॅक्स : (०२२) २२६७४२९५

# मध्यस्थी
# (MEDIATION)

## मध्यस्थी एक प्रक्रीया :-

मध्यस्ती म्हणजे ज्यात एक तटस्थ व्यक्ती म्हणजे मध्यस्थ, दोन्ही पक्षकारांमध्ये असणारा वाद परस्पर संमतीने सोडविण्यासाठी मदत करतो.



## मध्यस्थीकरीता प्रकरण कसे पाठवले जाते :-

- एखादे प्रकरण सामोपचाराने मिटेल अशी शक्यता असते, त्यावेळी संबंधीत न्यायाधीश ते प्रकरण पक्षकारांच्या संमतीने मध्यस्थी करीता पाठवू शकतात.
- जर पक्षकारांस आपले प्रकरण मध्यस्थी मार्फत मिटवावे असे वाटत असेल तेव्हा ते संबंधीत न्यायाधीशाकडे अर्ज करुन प्रकरण मध्यस्थी करीता पाठवण्यास विनंती करु शकतात.
- एखाद्या प्रकरणात न्यायाधीशास ते प्रकरण मध्यस्थीमार्फत संपू शकते असे वाटल्यास त्या प्रकरणातील पक्षकारांच्या संमतीशिवाय प्रकरण मध्यस्थीसाठी पाठवू शकतात.

## मध्यस्थीकरीता कोणती प्रकरणे पाठवली जाऊ शकतात?

- सर्व दिवाणी स्वरुपाची प्रकरणे उदा : मालमत्ते संबंधी, वाटप प्रकरणे, मनाई हुकूमाचे दावे इत्यादी.
- तडजोडपात्र फौजदारी प्रकरणे
- पती-पत्नी यांचे मधील सर्व प्रकारची प्रकरणे (फौजदारी - तडजोडप्राप्त नसणारी प्रकरणे सोडून)
- धनादेश (चेक) बाऊन्स परक्राम्य लेख अधिनियम - कलम १३८ अंतर्गत प्रकरणे

## मध्यस्थीची प्रक्रीयामधील टप्पे

१. ओळख - मध्यस्थी त्याची ओळख पक्षकारांना करुन देतो व मध्यस्थी प्रक्रीयेची माहिती समजाऊन सांगतो.

२. दोन्हीही पक्षकारांची संयूक्त बैठक - ज्यांच्यातील वाद संदर्भात सामोपचाराने समेट घडून यावे याकरीता अनुकूल वातावरण निर्माण करतो.

३. वैयक्तिक (विलक) बैठक - यांत पक्षकारांना त्यांच्या तक्रारी, मागण्या, अपेक्षा विस्तृतपणे सांगण्याची मुभा देतो.

४. करार - मध्यस्थ समेटाच्या अटीवर शिक्कामोर्तब करुन त्यांची स्पष्टता व्यक्त करतो आणि पक्षकारांना स्विकार्य असेल त्याप्रमाणे समेटाच्या अटींची स्पष्टपणे, मुद्देसुद आणि ठोसपणे नोंद करतो.

## मध्यस्थी प्रक्रियेला किती कालावधी लागतो.

अनेक प्रकरणे दोन-एक बैठकीत सोडविली जातात, परंतु काही किचकट वाद प्रकरणात परिणामकारक निराकरणाकरीता अधिक सत्राची गरज लागु शकते. सर्वसाधारणपणे मध्यस्थ प्रक्रियेकरीता अधिकतम ६० दिवसांचा कालावधी लागतो.

## मध्यस्थी पध्दतीचे फायदे :

१. विषयातील पक्षकारांना त्यांची मते, दृष्टिकोण प्रत्यक्षपणे अनौपचारीकपणे, गोपनियतेने आणि सुडाच्या भितीशिवाय मांडता येतात.

२. वेळ, पैसा आणि शक्तीची बचत होते.

३. दोन्ही पक्षकारांतील वैरभाव कमी होतो.

४. त्यांना त्यांचा व्यवसाय / धंदा व वैयक्तिक संबंध पून:प्रस्थापित होण्यास व टिकवून ठेवण्याची संधी प्राप्त होते.




**महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, मुंबई**

१०५, उच्च न्यायालय (पी.डब्ल्यू.डी.) इमारत, फोर्ट, मुंबई ४०० ०३२

वेबसाईट : legalservices.maharashtra.gov.in ❖ ई-मेल : mslsa-bhc@nic.in

फोन : (०२२) २२६९१३९५ / २२६६५८६६ / (०२२) २२६९१३५८ ❖ फॅक्स : (०२२) २२६७४२९५

# वैकल्पीक वाद निवारण पध्दती



**उद्देश :** वाद उदभवला तर तो शक्यतोवर सामजस्याने सोडवावा ही आपली प्राचीन परंपरा, गावातील जुनी जाणती माणसे एकत्र येत आणि कोणाहीमध्ये उदभवलेला कुठल्याही स्वरूपाचा वाद समजुतीने मिटवीत, ज्याच्यापुढे वाद नेला जाई ते त्या गावातील आदरणीय आणि नि:पक्षपाती लोक असत त्यांचेच आधुनिक स्वरुप म्हणजे वैकल्पीत वाद निवारण. काळाची गरज ओळखून दिवाणी प्रक्रिया संहितेमध्ये कलम ८९ नुसार दुरुस्ती करण्यात आली. या कलमानुसार सुसंवाद समेट व संमतीने लवाद यंत्रणेस एक कायदेशीर स्थान देण्यात आले आहे. न्यायालयातील प्रलंबित खटले सामोपचाराने व समझोत्याने तडजोड होऊन मिटावीत व ज्या खटल्यामध्ये तडजोडीची शक्यता आहे ते प्रकरण लवकरात लवकर निकाली व्हावे हा या दुरुस्ती मागचा उद्देश आहे.

## वैकल्पीत वाद निराकरण पध्दतीमध्ये तडजोडीबाबात अवलंबविण्यात येणारे मार्ग :

१) लवाद
२) समंन्वयक
३) लोकन्यायालय
४) मध्यस्थी

## वैकल्पीक वाद निवारण म्हणजे काय ?

वैकल्पीक वाद निवारण म्हणजे दोन्ही पक्षांनी संमती दिलेल्या ठरावानुसार वाद मिटविण्यासाठी तसेच पूढील वाद टाळण्यासाठी दोन्ही पक्षकारांना मान्य असेल अशा प्रकारच्या मध्यस्थिने दिलेल्या निवाडयावरील आदेश तसेच कायदेशीर बांधिलकी देणाऱ्या या विकसीत प्रक्रियेला वैकल्पीक वाद निवारण (एडीआर) असे म्हणतात.

## वैकल्पीक वाद निवारण पध्दतीतील मध्यस्थी, समेट व लोक अदालतीचे फायदे :

१. समेटामध्ये जिंकलो, हरलो हा भाव राहत नाही व दोन्ही पक्षकार तडजोडीने निकाल झाल्याने समाधानी होतात.
२. मतैक्य आणि मताभिन्नतेचे मुद्दे शोधून विवाद्य मुद्यांतील दरी कमी होते.
३. वेळेचा अपव्यय टळतो.
४. प्रवास, वकील फी व अन्य खर्चामध्ये बचत.
५. अपील, रिव्हीजन, वरिष्ठ कोर्टात दाद मागणे इत्यादीमधील श्रम व खर्च वाचतो.
६. वादाचा निर्णय लवकर व मैत्रीपूर्ण वातावरणात होऊ शकतो.
७. न्यायालयावरील कामाचा दबाव कमी होतो.
८. सामाजिक स्वास्थ्य व नैतिकता वाढीस मदत होते.




**महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, मुंबई**

१०५, उच्च न्यायालय (पी.डब्ल्यू.डी.) इमारत, फोर्ट, मुंबई ४०० ०३२

वेबसाईट : legalservices.maharashtra.gov.in ❖ ई-मेल : mslsa-bhc@nic.in

फोन : (०२२) २२६९१३९५ / २२६६५८६६ / (०२२) २२६९१३५८ ❖ फॅक्स : (०२२) २२६७४२९५

# मानसिक आरोग्य कायदा १९८७



प्रत्येक मानसिक आजार हा गंभीर मनोविकार नसतो. प्रत्येक मानसिक रोगी हा वेडा नसतो. आपल्या समाजात सर्व प्रकारचे लोक राहतात, त्यामध्ये मनोरुग्न देखील असतात. कुटूंबिय व समाजाकडून त्यांबाबत होणारा भेदभाव दूर करण्यासाठी सरकारने मानसिक आरोग्य कायदा १९८७ लागू केलेला आहे. त्या कायद्याने मनोरुग्नाचे अधिकार, कायदेशीर सुरक्षा व उपचार पध्दती व सुविधा कशा असाव्यात ह्याबाबत नमुद केले आहे.

## मनोरुग्णांकरीता कोणत्या सुविधा पूरविलेल्या आहेत?

- केंद्र सरकार देशात व राज्य सरकार राज्यात कुठेही मनोरुग्णाचे उपचारासाठी मनोरुग्णालये आणि सुश्रृषालय उघडू शकते, यामध्ये मानसिक आजाराने ग्रस्त लोकांना भरती केले जाते व त्यांचेवर उपचार तसेच त्याची उत्तम देखभाल केली जाते.
- १६ वर्षांपेक्षा कमी वयाच्या मनोरुग्णासाठी वेगळी मनोरुग्णालये उघडून त्यात भरती केली जाते.
- दारु आणि इतर मादक पदार्थांचे सेवन करणाऱ्या मनोरुग्णाकरीता आणि कुठल्याही अपराधसिध्द दोषी मनोरुग्णासाठी वेगळी मनोरुग्णालये व सुश्रृषालय उघडली जातात.

## स्विकार आदेश (Reception Order) म्हणजे काय?

- मानसिक आरोग्य कायदा १९८७ मध्ये असलेल्या तरतूदींनुसार मनोरुग्णास मनोरुग्णालयात किंवा सुश्रृषालयात प्रवेश किंवा स्थानबध्द करण्याकरीता आवश्यक असणा-या आदेशास स्विकार आदेश म्हणतात.


## स्विकार आदेश (Reception Order) मिळण्यासाठी अर्ज कोठे करावा लागतो.

- जर मनोरुग्णाची स्थिती चिंताजनक असेल तर कधी कधी त्याला ६ महिन्यांपेक्षा जास्त कालावधीसाठी मनोरुग्णालयात दाखल करावे लागते. अशा रुग्णाकरीता पती–पत्नी किंवा त्यांचा कुणीही नातेवाईक अर्ज करु शकतो, त्यास मनोरुग्णालयात दाखल करण्यासाठीचा अर्ज म्हटले जाते, तो अर्ज न्यायदंडाधिकारी यांचेकडे करावा लागतो.

## मनोरुग्णासंदर्भात पोलिसांची जबाबदारी काय असते?

- मानसिक दृष्ट्या आजारी व्यक्ती जर बाहेर फिरताना आपली स्वत:ची देखभाल करु शकात नसेल तर पोलिस ठाण्याचा अधिकारी त्याला आपल्या सुरक्षीतेखाली घेईल.
- मानसिक रोगी जर दुसऱ्या लोकांकरीता धोकादायक होऊ शकत असेल तर त्याला पोलिस अधिकारी ताब्यात घेईल.
- अशा मनोरुग्ण संदर्भात पोलिस अधिकारी त्याचे नातेवाईक व मित्रांना कळवेल.
- अशा मनोरुग्णास २४ तासाचे आत न्यायदंडाधिकाऱ्यासमोर हजर करावे लागेल. न्यायदंडाधिकाऱ्याच्या आदेशाशिवाय त्याला २४ तासांपेक्षा अधिक काळ स्थानबध्द करुन ठेवता येणार नाही.

## मनोरुग्णाला मानवाधिकार असतात का?



- होय, मनोरुग्णास उपचारा दरम्यान त्याची शारीरीक किंवा मानसिक छळ करणे हा गुन्हा आहे.
- अशा व्यक्तिचा उपयोग कोणत्याही वैज्ञानिक संशोधनासाठी करता येत नाही. पण त्या व्यक्तीच्या वैद्यकीय इलाजाच्या दृष्टीने फायदेशीर असल्यास किंवा सदर व्यक्ती हा स्वत: दाखल झाला असल्यास व त्याने लेखी संमती दिल्यास किंवा सदर व्यक्ती संमती देण्यास अपात्र असल्यास त्याच्या पालक अथवा संमती देण्यास पात्र असणा-या व्यक्तीचे लेखी संमतीने त्याचेवर संशोधन करता येईल.


**महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, मुंबई**

१०५, उच्च न्यायालय (पी.डब्ल्यू.डी.) इमारत, फोर्ट, मुंबई ४०० ०३२

वेबसाईट : legalservices.maharashtra.gov.in ❖ ई-मेल : mslsa-bhc@nic.in

फोन : (०२२) २२६९१३९५ / २२६६५८६६ / (०२२) २२६९१३५८ ❖ फॅक्स : (०२२) २२६७४२९५